# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर- ४१६००४

परिपत्रक क्र.कोविमं/माध्य.परीक्षा/2289 / दिनांक ०५/०१/२०२२

विषय : मार्च-एप्रिल २०२२ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या खेळाडू विद्यार्थी व दिव्यांग विद्यार्थ्यांचे प्रस्ताव मंडळ कार्यालयास सादर करण्याबाबत.. ..

**(१) विशेष गरजा असलेले दिव्यांग विद्यार्थी (दृष्टिबाधित, अध्ययन अक्षम, कर्णबधिर, अस्थि विकलांग, बहुविकलांग, स्वमग्न) यांना मिळणाऱ्या सवलतीबाबत:-**

विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांना मंडळाच्या परीक्षेमध्ये जादा वेळेची सवलत तसेच उत्तीर्ण होण्यासाठी मिळणाऱ्या जादा गुणांची सवलत इ. सवलती निर्दिष्ट केलेल्या आहेत. तथापि सदर दिव्यांग प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे प्रस्ताव वेळेत सादर न केल्यामुळे किंवा परीक्षेनंतर सादर केल्यामुळे बरेच विद्यार्थी मंडळाच्या उपरोक्त सवलतीपासून वंचित राहतात, असे मंडळाच्या निदर्शनास आले आहे.

मार्च-एप्रिल २०२२ मध्ये होणाऱ्या माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस अशा प्रवर्गातून प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना हव्या असलेल्या सवलती मागणीसह **परिपुर्ण प्रस्ताव मुळ कायमस्वरुपी वैद्यकिय प्रमाणपत्रासह सादर करावेत तथापि ज्या विद्यार्थ्यांचे कायमस्वरुपी वैद्यकीय प्रमाणपत्र नसल्यास मंडळाने निर्धारित केलेल्या सोबत जोडलेल्या विहित नमुन्याप्रमाणे जिल्हा शल्यचिकीत्सक (सिव्हील सर्जन) यांच्या प्रतीस्वाक्षरीने प्रस्ताव सादर करावेत.**

तरी सर्व शाळा प्रमुखांनी वरील महत्त्वाच्या सर्व मुद्यांची नोंद घेवून त्यांच्या शाळेतील विद्यार्थ्यांची गैरसोय होणार नाही, तसेच पालकांच्या तक्रारी येणार नाहीत, या दृष्टीने प्रयत्न करून उपरोक्तबाबतचे सर्व प्रस्ताव **शनिवार दिनांक ०५ फेब्रुवारी,२०२२** पर्यत मंडळाकडे पोहोचतील अशा बेताने पोस्टाने अथवा हस्तपोहोच पाठवावेत.

**(२) एन.सी.सी व स्काऊट गाईड विद्यार्थी गुण सवलतीबाबत:-**

शैक्षणिक वर्ष सन १८-१९ पासून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना व एन.सी.सी. व स्काऊट गाईड मधील विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबत सुधारीत कार्यपध्दती शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, उमाशि-२०१५/प्र.क्र.२६२/एस.डी.२ दि.२०/१२/२०१८ व शासन शुध्दिपत्र क्र. उमाशि-२०१५/प्र.क्र.२६२ एस.डी.२ दिनांक २५ जानेवारी १९ अन्वये निश्चित करण्यात आलेली आहे.

माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापकांनी मार्च-एप्रिल २०२२ मध्ये प्रविष्ठ होण्याऱ्या खेळाडू व एन.सी.सी. व स्काऊट गाईड मधील विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबतचे प्रस्ताव शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याकडे विहित नमुन्यात प्रमाणपत्रासह सादर करावेत.

**संबंधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी संबंधित शाळेचे मुख्याध्यापक/प्राचार्य यांच्या कडून प्राप्त झालेले विहित नमुन्यातील एन.सी.सी.व स्काऊट गाईड गुणांसाठीचे अर्ज, समादेशक अधिकारी/गटप्रमुख, राष्ट्रीय छात्रसेना व जिल्हा संघटन आयुक्त स्काऊट गाईड यांचेकडून प्राप्त झालेल्या अभिलेख्यानुसार छाननी करुन त्या शैक्षणिक वर्षातील ३० एप्रिल २०२२ पर्यंत या विभागीय मंडळ कार्यालयास शिफारशीसह सादर करावेत.**

**(३) खेळाडू विद्यार्थी गुण सवलतीबाबत:-**

सन २०२१-२२ च्या परीक्षेसाठी १४ ते १६ वर्षाखालील गटात म्हणजेच इ.६ वी पासून ते इ.१० वी पर्यंत केंव्हाही जिल्हा/विभाग/ राज्य/ राष्ट्रीय/ आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळलेल्या खेळाडू विद्यार्थ्यास इ.१० वी परीक्षेमध्ये वरील शासन शुध्दिपत्रातील सुधारीत परिशिष्ट ६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सवलतीचे गुण देण्यात येतील. क्रिडा प्रमाणपत्रावर विद्यार्थी कितव्या इयत्तेत असताना खेळला त्या इयत्तेचा उल्लेख असावा. तथापि **इ.१० वी पूर्वी जरी विद्यार्थ्यांने प्राविण्य मिळवले असले तरी सवलतीचे गुण मिळविण्याकरीता त्या विद्यार्थ्याने इ.१० वी मध्ये जिल्हास्तरावर क्रिडा प्रकारामध्ये सहभागी होणे आवश्यक आहे.**

खेळाडू विद्यार्थी हा कोणत्याही जिल्ह्यातून खेळला तरी खेळाडू विद्यार्थी ज्या ठिकाणी शिकत असेल त्या जिल्ह्याच्या क्रिडा अधिकारी यांनी त्यास प्रमाणित करावे.

इ.१० वी चे एन.सी.सी चे छात्र व तसेच स्काऊट व गाईड विद्यार्थ्यांसाठी विविध स्तरावरील शिबीरे व संचालनाचा कालावधी हा त्या त्या शैक्षणिक वर्षातील इ.१० वी च्या परीक्षेपूर्वीचा कालावधी ग्राह्य धरण्यात येईल.

इ.१० वी मध्ये शिकत असलेला खेळाडू विद्यार्थी हा एका पेक्षा अधिक खेळात/क्रिडा स्पर्धेत, एन.सी.सी. तसेच स्काऊट गाईड ची शिबीरे यात सहभागी झालेला असेल तर त्याला उच्चतम असणाऱ्या एकाच सहभाग/प्राविण्यचे सवलतीचे गुण अनुज्ञेय राहतील. खेळाडू विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे गुण ग्राह्य धरण्यासाठी विभागीय मंडळाकडे सादर केलेल्या प्रमाणपत्रावर जिल्हा क्रीडा अधिकारी यांची प्रतिस्वाक्षरी असणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्याने ज्या खेळात सहभाग घेतला असेल त्या खेळाचे आयोजन करणाऱ्या संघटनेचे नाव क्रीडा संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मान्यताप्राप्त यादीत असणे आवश्यक आहे.**विशेष गुण सवलतीचा लाभ फक्त नियमित विद्यार्थ्यांना लागू राहील.खाजगी/बहिस्थ विद्यार्थ्यांना सदरची सवलत अनुज्ञेय नाही, याची नोंद घ्यावी.** कोणताही पात्र नियमित विद्यार्थी या सवलतीपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी.

**जिल्हास्तरावरील,विभागस्तरावरील, राज्यस्तरावरील स्पर्धांमध्ये केवळ प्राविण्य मिळविणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांनाच गुणांची सवलत उपलब्ध राहील. मात्र राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्राविण्य प्राप्त करणाऱ्या तसेच सहभागी होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना क्रिडा गुणाच्या सवलती देय राहतील.**

माध्यमिक शाळाप्रमुखांनी यासंदर्भात प्रस्ताव सादर न केल्यामुळे, परिपूर्ण माहिती न कळविल्यामुळे आवश्यक त्या कागदपत्रांची / प्रमाणपत्रांची पूर्तता न केल्यामुळे जर एखादा पात्र विद्यार्थी या सवलतीपासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी शाळा प्रमुखांवर राहील याची नोंद घ्यावी.

खेळाडू विद्यार्थ्यांनी स्पर्धा संपन्न झाल्यानंतर आपले अर्ज प्रमाणपत्रासह त्वरीत मुख्याध्यापक यांच्याकडे सादर करावेत, व मुख्याध्यापकांनी खेळाडू विद्यार्थ्याच्या अर्जाची शहानिशा करून संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडे सादर करावा. **जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांनी शिफारशीसह मंडळाने निर्धारीत केलेल्या विहित नमून्यात ३० एप्रिल २०२२ पर्यत परिपूर्ण प्रस्ताव कार्यालयाकडे पोहोचतील या बेताने हस्तपोच पाठवावेत. तद्नंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.**

**सदरच्या सर्व सूचना नोटीस बोर्डवर लावून त्या सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणाव्यात. वरील प्रमाणे कार्यवाही न झाल्यास आणि त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्यास त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी शाळा प्रमुखांची राहिल याची गंभीरपणे नोंद घ्यावी. उपरोक्त बाबतचे सर्व विहित फॉर्म व माहिती, मंडळाचे संकेतस्थळ www.sscboardkolhapur.in वर उपलब्ध आहेत. ते पाहून त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.**

(सत्यवान सोनवणे)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

**सोबत:- विहित नमुन्यातील सर्व फॉर्म (उदा. दिव्यांग विद्यार्थ्यांचे सर्व फॉर्म )**

**प्रत पुढील कार्यवाहीस्तव:-**

१) सर्व मान्यता प्राप्त **माध्यमिक शाळाप्रमुख,**
सातारा /सांगली / कोल्हापूर जिल्हा.

**प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव :-**

१. **शिक्षणाधिकारी (माध्य),** जिल्हा परिषद, सातारा / सांगली / कोल्हापूर

२. **जिल्हा क्रीडा अधिकारी,** सातारा / सांगली / कोल्हापूर

**प्रत माहितीस्तव -**

१. **शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.**